५८१

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ३१/१२/२०२४.

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४० /सेवा-४, दि.३० डिसेंबर-२०२४

**विषय** :- राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अतंर्गत मासिक अंशदानाच्या रकमा प्रान खाती जमा करण्याबाबत सुधारीत कार्यपध्दती.

*******

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४० /सेवा-४, दि.३० डिसेंबर-२०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२३०१२०५४१६६०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

**( प्रविण शिखरे )**
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना / आर्थिक गुन्हे / नियोजन व समन्वय / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / लोहमार्ग / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / रा.रा.पो.बल ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर सुरक्षा / नागरी हक्क संरक्षण / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग / व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी का .क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त व लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.


Scanned with CamScanner

**राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत मासिक अंशदानाच्या रकमा प्रान खाती जमा करण्याबाबत सुधारीत कार्यपध्दती .**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४०/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांकः ३०.१२.२०२४.

**वाचा :-** १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- अंनियो-१००७/१८/सेवा-४, दि.०७.०७.२००७.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा ४, दि.२७.०८.२०१४.
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- अंनियो-२०१५/(NPS)प्र.क्र.३२/सेवा-४, दि.०६.०४.२०१५.
५) केंद्र शासनाचे Office Memorandum, Ministry of Finance, Office of Controller General of Accounts, New Delhi dated ०२.०९.२००८.
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.रानियो-२०२३/प्र.क्र.६४/सेवा-४, दि.०४.१२.२०२३.

**प्रस्तावना**

संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्य शासनाने दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू केली आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये राज्य शासन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत सहभागी होईल असा निर्णय घेतला आहे. तसेच संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीअंतर्गत स्तर-१ ची राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरिताची अंमलबजावणीची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचे मासिक अंशदान जमा करण्याच्या कार्यपध्दतीच्या अनुषंगाने महालेखापाल कार्यालय, मुंबई यांनी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाबाबत पुढीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे –

The provision and expenditure on the government contribution to the DCPS/NPS is required to be made under the head "2071-Pension & Other Retirement Benefits, 117-Defined Contribution Pension Scheme."

महालेखापाल कार्यालय, मुंबई यांनी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाबाबत उपरोक्तप्रमाणे नोंदविलेले निरीक्षण व संदर्भ क्र.५ येथील केंद शासनाच्या ज्ञापनास अनुसरुन नियोक्त्याच्या / शासनाच्या अंशदानाची रक्कम वेतनाच्या लेखाशीर्षाखाली खर्च न होता "2071-Pension & Other Retirement Benefits, 117-Defined Contribution Pension Scheme" या लेखाशीर्षामधून खर्च करण्यासंदर्भातील कार्यपध्दतीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक :</u>**

महालेखापाल कार्यालय, मुंबई यांनी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाबाबत नोंदविलेल्या निरीक्षण व केंद्र शासनाचे दि.०२.०९.२००८ च्या ज्ञापनास अनुसरुन संदर्भाधीन क्र.४ येथील शासन निर्णयामधील कार्यपध्दतीमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**१. राज्य शासकीय सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या मासिक अंशदानाबाबत –**

**१.१ आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही –**

**१.१.१** आहरण व संवितरण अधिकारी यांनी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत समाविष्ट असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतन देयकामधून दरमहा केवळ कर्मचाऱ्याच्या अंशदानाची वसूली (मूळ वेतन + महागाई वेतन(असल्यास) + महागाई भत्ता या रकमेच्या १०%) करण्यात यावी. **यामध्ये नियोक्त्याच्या अंशदानाचा समावेश नसावा.**

**१.१.२** राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत समाविष्ट असलेल्या राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी तसेच महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांची वेतन देयके स्वतंत्रपणे तयार करुन ती प्रत्येक महिन्याच्या २२ तारखेपर्यंत अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करण्यात यावीत.

**१.१.३** राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीखाली वजाती होणारी अधिकारी / कर्मचारी यांच्या अंशदानाची रक्कम खाली दर्शविल्याप्रमाणे संबंधित योजना सांकेतांकामध्ये प्रवर्गनिहाय जमा म्हणून दर्शविण्यात यावी.

| अ.क्र. | प्रवर्ग | अधिकारी / कर्मचारी यांच्या मासिक अंशदानाच्या जमेचे लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १ | राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी | ८३४२५०८१ |
| २ | भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी | ८३४२५२२१ |
| ३ | भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी | ८३४२५२४१ |
| ४ | भारतीय वन सेवेतील अधिकारी | ८३४२५२६८ |

**१.१.४** कर्मचाऱ्यच्या मासिक अंशदानाची रक्कम व तपशील दर्शविणारी आवश्यक ती **अनुसूची (Schedule)** वेतन देयकासोबत जोडण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

**१.१.५** राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी / कर्मचारी तसेच महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांच्या अंशदानाच्या वजावटी महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम २५९ (१) नुसार वेतन देयकाच्या दर्शनी भागावर – कोषागार वजाती म्हणून दर्शविण्यात याव्यात.

**१.१.६** नियोक्ता / शासनाच्या १४% अंशदानाचे अधिकारी / कर्मचारी यांचे Projected Employer Contribution Schedule वेतन देयकासोबत तयार होईल. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरच्या अनुसूचीतील नियोक्ता / शासनाच्या १४% अंशदानाच्या रकमेची परिगणना तपासून प्रमाणित करावी व सदरचे Schedule वेतन देयकासोबत जोडावे.

**१.१.७** आहरण व संवितरण अधिकारी यांनी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत समाविष्ट असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची नियमित वेतन देयके सेवार्थ प्रणालीमध्ये तयार करताना, कर्मचाऱ्यांच्या १०% तसेच नियोक्ता/ शासनाच्या १४% अंशदानाच्य रकमा Auto-calculate होतील. तथापि, Pay Arrears / DA Arrears / Pay Arrears Difference / DA Arrears Difference ची थकबाकीची देयके तयार करताना, कर्मचाऱ्यांच्या १०% तसेच नियोक्ता / शासनाच्या १४% अंशदानाच्या रक्कमेची आहरण व संवितरण अधिकारी यांनी परिगणना करुन ती रक्कम सेवार्थ प्रणालीमध्ये (Manually) भरावी.

**१.१.८** आहरण व संवितरण अधिकारी यांनी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत समाविष्ट असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या आयकराची परिगणना करताना, नियोक्ता / शासनाच्या अंशदानाची १४% रक्कम वेतनाच्या स्थूल रकमेमध्ये दर्शविण्यात यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. नियोक्ता / शासनाच्या अंशदानाची अधिकारी / कर्मचारी निहाय यादी सेवार्थ प्रणालीमध्ये उपलब्ध असेल.

**१.२ अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी करावयाची कार्यवाही**

**१.२.१** अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत सामील असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतन देयकामधून **केवळ** कर्मचाऱ्याच्या अंशदानाची वसूली संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेमार्फत करण्यात आली असेल तरच वेतन देयके पारित करण्यात यावीत अन्यथा नाकारण्यात यावीत. वेतन देयकामध्ये नियोक्त्याच्या अंशदानाचा समावेश असणार नाही याची खातरजमा करण्यात यावी. तद्नंतरच राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांची प्राप्त वेतन देयके प्राधान्याने पारित करुन प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेपर्यंत प्रमाणक क्रमांक (Voucher No.) संस्करीत करावेत.

**१.२.२** अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन देयकास प्रमाणक क्रमांक संस्करीत झाल्यानंतर, अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी नियोक्त्याच्या अंशदानाच्या रक्कमा आहरित करण्याकरिता म.को.नि. साधी पावती नमुना ४५-अ **निरंक रक्कमेची (Nil Bill)** महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकारी व राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता स्वतंत्र देयके सेवार्थ प्रणालीमध्ये Auto-generate स्वरुपात तयार करावीत.

**१.२.३** नियोक्त्याच्या अंशदानाच्या रक्कमा आहरीत करण्याकरिता, महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचेकरिता "2071-**Pension & Other Retirement Benefits**, 117-**Defined Contribution Pension Scheme** (2071 0651)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी यांचेकरिता ८३४२५३६६, भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी यांचेकरिता ८३४२५०२६, भारतीय वन सेवेतील अधिकारी यांचेकरिता ८३४२५३७५ या लेखाशीर्षाखाली जमा दर्शविण्यात यावी. तसेच राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता "2071-**Pension & Other Retirement Benefits**, 117-**Defined Contribution Pension Scheme** (2071 0642)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून ८३४२५०९९ या लेखाशीर्षाखाली जमा दर्शविण्यात यावी.

**१.२.४** वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.रानियो-२०२३/प्र.क्र.६४/सेवा-४, दि.०४.१२.२०२३ सोबतच्या विवरणपत्रामधील मुद्दा क्र.३.१ मध्ये "प्रत्येक महिन्याच्या २६ तारखेला SCF तयार करुन NPS प्रणालीवर अपलोड करावी. मासिक अंशदानाची रक्कम SCF तयार करुन NPS प्रणालीवर अपलोड झाल्याच्या दिनांकापासून ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत विश्वस्त बँकेकडे (Trustee Bank) वर्ग करावी" असे नमूद आहे. तथापि, नियोक्त्याच्या अंशदानाच्या रकमा आहरित करण्याकरिता निरंक देयक तयार करुन पारित करण्याचा कालावधी लक्षात घेता, अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयातून नियोक्त्याच्या अंशदानाचे निरंक रकमेचे देयक पारित झाल्यानंतर प्रत्येक महिन्याच्या २९ तारखेला कर्मचाऱ्याचे अंशदान व नियोक्त्याचे अंशदान संदर्भात Subscriber Contribution File (SCF) तयार करुन CRA-NPSCAN प्रणालीमध्ये अपलोड (Upload) करावी व व्यवहार क्रमांक (Transaction ID) प्राप्त करुन घ्यावा.

**१.२.५** अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी "८३४२-Other Deposits-००-११७-Defined Contribution Pension Scheme" या लेखाशीर्षाखाली कर्मचाऱ्याच्या व नियोक्त्याच्या अंशदानाच्या जमा रकमा आहरित करण्याकरिता ८३४२०१३२ या मुख्य लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून साधी पावती म.को.नि.नमुना ४५-अ मध्ये देयक सादर करावे.

**१.२.६** सदर देयकाद्वारे आहरित करण्यात आलेली मासिक अंशदानाची रक्कम, Subscriber Contribution File (SCF) CRA-NPSCAN प्रणालीमध्ये अपलोड (Upload) झाल्याच्या दिनांकापासून ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत विश्वस्त बँकेकडे (Trustee Bank) वर्ग करण्यात यावी.

२. **प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी यांच्या मासिक अंशदानाबाबत**

प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी यांच्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीअंतर्गत मासिक अंशदानाची वसुली व सदर वसूलीची रक्कम जमा करण्याबाबत शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४, दि.०६.०४.२०१५ नुसार विहित कार्यपध्दती लागू राहील.

३. हे शासन निर्णय जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषितर विद्यापिठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये तसेच कृषी विद्यापिठे व तत्सम अनुदानित संस्थामधील कर्मचाऱ्यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफरांसह लागू राहील. मात्र याबाबत स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही त्यांच्या स्तरावरुन करावी.

४. उपरोक्त कार्यपध्दती कोषागार कार्यालय, वाशिम अंतर्गत सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून **दि.१५.०२.२०२५** पासून सेवार्थ प्रणालीत तयार होणारी वेतन देयके तसेच वेतनाची पुरक देयकांसंदर्भात नियोक्त्याच्या / शासनाच्या अंशदानाची रक्कम 2071-Pension & Other Retirement Benefits, 117-Defined Contribution Pension Scheme या लेखाशीर्षामधून खर्च करण्यासंदर्भातील सुधारीत प्रायोगिक तत्वावर चालू करण्यात येत आहे. **दि.१५.०३.२०२५** पासून सेवार्थ प्रणालीत तयार होणारी वेतन देयके तसेच वेतनाची पुरक देयकांसंदर्भात नियोक्त्याच्या / शासनाच्या अंशदानाची रक्कम 2071-Pension & Other Retirement Benefits, 117-Defined Contribution Pension Scheme या लेखाशीर्षामधून खर्च करण्यासंदर्भातील सुधारीत कार्यपध्दती सर्व कोषागार कार्यालयांच्या स्तरावर चालू करण्यात येईल.

५. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४१२३०१२०५४१६६०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MANISHA YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=a7f08db3910ecf0f88c442fbde20f7b84e70dfd0bf4dcd97 7abab75b3fcb8508, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119 E4A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2024.12.30 12:06:46 +05'30'

**( मनिषा यु.कामटे )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.

२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
७) संचालक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
८) सह संचालक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०) सर्व जिल्हा कोषागारे व उपकोषागारे.
११) मा.राज्यपालांचे सचिव.
१२) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
१३) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
१४) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय व अपील शाखा), मुंबई.
१६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१८) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१९) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
२०) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२१) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२२) मंत्रालयातील सर्व विभाग.
२३) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे कार्यालय प्रमुख.
२४) सर्व विभगीय आयुक्त.
२५) निवड नस्ती.